


# महाराष्ट्र शासन

# अर्थसंकल्प २०२२-२३

# सर्वसाधारण चर्चा


**समर्थन, अर्थसंकल्प अध्ययन केंद्र**

१०५, लोटस हाऊस, लिबर्टी सिनेमाच्या बाजूला, बॉम्बे हॉस्पिटल जवळ, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग,

मरिन लाईन्स (पू), मुंबई -४०० ०२० ☏०२२-२२००३०६०

🖂: samarthanmumbai97@gmail.com / www.samarthanadvocacy.org

**समर्थन**

संस्थापक अध्यक्ष : **स्व. सदानंद वर्दे**

संस्थापक : **श्री. विवेक पंडित**

अध्यक्ष : **श्री. प्रविण महाजन**

उपाध्यक्ष: **श्री. आशिष कुलकर्णी**

कार्याध्यक्ष: **श्री. संतोष पाटील**

सचिव: **डॉ. आशिष भोसले**

संपादन : **मुक्ता भारती व हिंदप्रभा कर्वे**

विश्लेषण आणि संकलन:
**रुपेश कीर** -९८९२९३९६१७

विशेष सहाय्य :
**निलम काकड, स्नेहा घरत, विलास सुवरे, मनोज सातवी, उमेश सांगळे व राजश्री कदम**

मांडणी व अक्षरजुळणी:
**प्रतिक्षा कोयंडे**

**नोंदणी क्रमांक:**
पब्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन क्र.एफ -१८९०३, मुंबई
सोसायटी रजिस्ट्रेशन क्र. एम. एस. मुंबई
१५६७/९६ जीबीबीएसडी

प्रकाशक (पत्रव्यवहार):
१०५, लोटस हाऊस, लिबर्टी सिनेमाच्या बाजूला,
बॉम्बे हॉस्पिटल जवळ, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग,
मरिन लाईन्स (पू), मुंबई -४०० ०२०
☏०२२-२२००३०६०

Email:samarthanmumbai97@gmail.com
website: www.samarthanadvocacy.org

# लोकशाही बळकट करण्याकरिता उपेक्षितांचे ‘समर्थन’

### समर्थन विषयी थोडेसे

धोरणात्मक प्रश्नांवर राज्यातील विविध उपेक्षित समाजघटक व धोरणकर्ते यांच्यामधील दुवा म्हणजे ‘समर्थन’. राज्याच्या धोरणात्मक निर्णयांमध्ये उपेक्षितांच्या आशा-आकांक्षा प्रतिबिंबीत व्हाव्यात, त्यासाठी लोकशाही यंत्रणा अधिक लोकाभिमुख व्हाव्यात हा समर्थनचा उद्देश. समर्थन उपेक्षितांच्या न्याय्य हक्कांचे, त्यांच्या संघर्षाचे.

### ‘समर्थन’च्या कामाचे विविध स्तर

◊ ग्रामीण संघटनांकडून व ग्रामीण पत्रकारांकडून येणारे लोकांचे प्रश्न समजून घेणे.

◊ प्रश्नांना राज्यस्तरावर प्रसारमाध्यमांद्वारे प्रसिद्धी देणे.

◊ प्रश्नांवर विविध स्तरांवर चर्चा घडवून आणणे.

◊ विधिमंडळ सदस्यांपर्यंत प्रश्न पोहोचविणे.

◊ राज्य स्तरावर विविध लोकशाही यंत्रणांकडे, प्रशासनाकडे प्रश्नांचा पाठपुरावा करणे.

◊ आवश्यक असल्यास न्याययंत्रणेकडे दाद मागणे.

◊ ग्रामीण कार्यकर्ते व ग्रामीण पत्रकारांच्या क्षमता व कौशल्ये वाढावित यासाठी प्रशिक्षण देणे.

◊ लोकशाही यंत्रणेबाबतची माहिती प्रसारित करणे.

◊ अर्थसंकल्पासह राज्याच्या महत्त्वाच्या धोरणांचे विश्लेषण करणे.

# टिपण वाचण्यापूर्वी थोडेसे. . .

- ‘समर्थन’ची प्रकाशने सत्तेतील तसेच विरोधातील सन्माननीय सदस्यांना उपयुक्त व्हावीत यासाठी असतात.
- सदर माहिती टिपणाचा उद्देश विधिमंडळ सभागृहांमध्ये राज्याच्या अर्थसंकल्पावर होणाऱ्या चर्चेत राज्याच्या अर्थसंकल्पातील माहिती सुलभपणे वाचता यावी आणि त्यामुळे विधिमंडळात दर्जेदार चर्चा व्हावी हा आहे.
- अर्थसंकल्प हा राज्याच्या धोरणाचा खराखुरा चेहरा असतो, प्राधान्यक्रमाचा आरसा असतो त्यामुळे अर्थसंकल्पातील तरतुदी राज्यातील दीन-दुर्बल घटकांच्या जीवनावर काय प्रभाव टाकतात यावर सभागृहात चर्चा व्हावी अशी अपेक्षा असते.
- माध्यमे जनमतावर प्रभाव टाकतात त्यामुळे धोरणकर्त्यांना त्याची दखल घ्यावी लागते. हे टिपण माध्यम प्रतिनिधींनाही संदर्भ पुस्तिका ठरावी असा प्रयत्न आहे.
- सदरची माहिती अर्थसंकल्पीय प्रकाशने, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या वित्तीय अहवाल, विनियोजन लेखे, शासनाच्या विविध विभागांनी, महामंडळांनी प्रकाशित केलेले अहवाल याच माहितीवर आधारित आहे. त्यात शासनाव्यतिरिक्त अन्य संस्थांची मते अगर माहिती यांचा आधार घेतलेला नाही. त्यामुळे प्रत्येक माहितीखाली त्या माहितीचा स्त्रोत दिला आहे.
- तुलनात्मकअभ्यास करता यावा म्हणून २०१४-१५ पासून २०२०-२१ पर्यंत प्रत्यक्ष खर्च आणि २०२१-२२ सुधारित अंदाज तसेच २०२२-२३चे अर्थसंकल्पीय अंदाज समाविष्ट केले आहेत.
- सदर माहिती काटेकोरपणे तपासण्यात आली आहे. तरीही काही त्रुटी राहिल्यास त्या निदर्शनास आणल्यास ऋणी राहू.
- प्रकाशन अधिक माहिती पूर्ण सुलभ आणि प्रभावी व्हावे म्हणून आपल्या सूचनांचे स्वागत आहे.
- अर्थसंकल्पविषयक अधिक माहिती जाणून घेण्याची कुणाची इच्छा असल्यास या विषयातील अनुभवी पत्रकार, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ, विषयतज्ज्ञ तसेच निवृत्त सनदी अधिकारी यांचेमार्फत प्रत्यक्ष चर्चा घडवून आणण्याची जबाबदारी समर्थन स्वीकारीत आहे.
- प्रमुख सामाजिक सेवांचे विभागवार टिपण टप्प्या-टप्प्याने प्रसिद्ध करण्यात येईल.

विश्लेषण आणि संकलन:रुपेश कीर -९८९२९३९६१७

**मार्गदर्शक-विवेक पंडित**

संस्थापक, समर्थन

# राज्य अर्थसंकल्प २०२२-२३

## दृष्टिक्षेपात अर्थसंकल्प :

☞ सन २०२२-२३चा राज्याचा एकूण अर्थसंकल्प रु. ५ लाख ४८ हजार ४०७ कोटी ५२ लाखांचा आहे. मागील अर्थसंकल्प रु. ४ लाख ८४ हजार ९० कोटी ६७ लाखांचा होता, म्हणजे मागील वर्षाच्या तुलनेत अर्थसंकल्पात रु. ६४ हजार ३१६ कोटी ८५ लाखांनी वाढ झालेली आहे. अर्थसंकल्पातील ही वाढ (११.७३%) इतकी आहे.

☞ सन २०२१-२२चा  अर्थसंकल्प रु.४ लाख ८४ हजार ९० कोटी ६७ लाखांचा होता, या वर्षीचे सुधारलेले अंदाज रु.४ लाख ९६ हजार ६३७ कोटी ९७ लाखांचे झालेले असून त्यामध्ये रु.१२ हजार ५४७ कोटी ३० लाखांची (२.५९%) वाढ दिसत आहे.

☞ सन २०२०-२१चा  अर्थसंकल्प रु.४ लाख ३४ हजार १८७ कोटी ९१ लाखांचा होता, परंतु प्रत्यक्ष खर्च रु. ४ लाख १ हजार ७२४ कोटी झाले आहेत. याचा अर्थ अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा प्रत्यक्ष खर्च रु. ३२ हजार ४६३ कोटी ७ लाखांनी (७.४८%) कमी झाला आहे.

## राज्य योजना व जिल्हा योजना :

☞ सन २०२२-२३ची एकूण योजना रु. १ लाख ५० हजार कोटींची असून वर्ष २०२१-२२ची योजना रु.१ लाख ३० हजार कोटींची होती, म्हणजे या वर्षीच्या योजनेत रु. २० हजार कोटींनी वाढ झाली आहे. मागील वर्षाच्या तुलनेत योजनेचे आकारमान १३.३३% वाढले आहे.

☞ सन २०२२-२३ची जिल्हा योजना रु. १३ हजार ३४० कोटींची होती, वर्ष २०२१-२२ मध्ये जिल्हा योजना रु. ११ हजार ३५ कोटींची होती म्हणजे या वर्षी त्यात १७.२८% वाढ झाली आहे.

## अनुसूचित जाती घटक कार्यक्रम :

✍ सन २०२२-२३ या वर्षासाठी अनुसूचित जाती घटक कार्यक्रमासाठी रु.१६ हजार ९ कोटी ५४ लाखांची तरतूद करण्यात आली आहे. सन २०२१-२२ मध्ये या योजनेसाठी रु. १२ हजार

७५८ कोटी ८४ लाखांची तरतूद करण्यात आली होती, याचा अर्थ या वर्षी या कार्यक्रमाच्या आकारमानात २०.३०% वाढ झाली आहे. सन २०२०-२१ या घटक कार्यक्रमासाठी रु. ९ हजार ६६८ कोटी निधी प्रस्तावित केला असताना प्रत्यक्ष खर्च रु. ६ हजार ४६१ कोटी ८४ लाख इतका झाला आहे. याचाच अर्थ या कार्यक्रमाच्या निधीतून रु. ३ हजार २०६ कोटी १६ लाखांची (३३.१६%) कपात झाली.

## आदिवासी घटक कार्यक्रम:

☞ सन २०२२-२३ या वर्षासाठी आदिवासी घटक कार्यक्रमासाठी रु. १४ हजार ७६१ कोटी ७६ लाखांची तरतूद करण्यात आली आहे. सन २०२१-२२ मध्ये या योजनेसाठी रु. १२ हजार ५९८ कोटी ४४ लाखांची तरतूद करण्यात आली होती. याचा अर्थ या वर्षी या योजनेच्या आकारमानात १४.६५% वाढ झाली आहे. सन २०२०-२१ मध्ये या कार्यक्रमासाठी रु. ९ हजार ४८४ कोटी ९४ लाखांचा निधी प्रस्तावित करण्यात आला होता, त्यापैकी रु. ७ हजार ४०५ कोटी १ लाखाचा निधी खर्च झाला . याचाच अर्थ या कार्यक्रमाच्या निधीतून रु. २ हजार ७९ कोटी ९३ लाखांची (२१.९२%) कपात झाली .

## महसुली व भांडवली जमा व तुटीचा राज्याच्या विकासावर परिणाम:

☞ सन २०२२-२३ मध्ये महसुली जमा रु. ४ लाख ३ हजार ४२७ कोटी २३ लाख इतकी अंदाजित केली असून महसुली खर्च रु. ४ लाख २७ हजार ७८० कोटी १२ लाख इतका होणार आहे. याचाच अर्थ रु. २४ हजार ३५२ कोटी ८९ लाखांची (६.०४%) महसुली तूट येणार आहे.

☞ सन २०२२-२३ मध्ये भांडवली जमा रु. ९२ हजार १४७ कोटी ३१ लाख होतील असा अंदाज असून भांडवली खर्च मात्र रु.६७ हजार ६२४ कोटी ४३ लाख होणार आहे. याचाच अर्थ भांडवली खर्चाला रु. २४ हजार ५२२ कोटी ८८ लाखांची (२६.६१%) कात्री लावली जाणार आहे.

☞ सन २०२०-२१ नुसार महसुली जमा रु. २ लाख ६९ हजार ४६७ कोटी ९१ लाख झाली असून महसुली खर्च मात्र रु.३ लाख १० हजार ६०९ कोटी ७५ लाख इतका झाला आहे. याचा अर्थ महसुली तूट रु. ४१ हजार १४१ कोटी ८४ लाखांनी (१५.२७%) वाढली आहे.

☞ सन २०२०-२१ची भांडवली जमा रु. ६६ हजार १६७ कोटी ५९ लाख इतकी झाली असून, भांडवली खर्च मात्र रु. ३२ हजार २८ कोटी ५५ लाख इतका झाला आहे. याचा अर्थ भांडवली खर्चात रु.३४ हजार १३९ कोटी ४ लाखांनी (५१.६०%) घट झाली आहे.

## राज्याची राजकोषीय तूट :

☞ सन २०२२-२३ मध्ये राज्याची राजकोषीय तूट रु. ८९ हजार ५९८ कोटी ३४ लाखांवर पोहोचली आहे.

## विकास व विकासेतर खर्च :

☞ सन २०२२-२३च्या एकूण खर्च रु.५ लाख ४८ हजार ४०७ कोटी ५५ लाख इतका असून त्यापैकी विकास खर्च रु. ३ लाख ५१ हजार १५७ कोटी ४० लाख (६४.०३%) इतका आहे. तर विकासेतर खर्च रु. १ लाख ९७ हजार २५० कोटी १५ लाख (३५.९७%) इतका आहे.

## राज्याला होणारी कर्ज प्राप्ती व एकूण कर्ज :

☞ राज्य शासनाला वर्ष २०२२-२३ मध्ये एकूण कर्ज प्राप्ती रु. ८९ हजार ७६८ कोटी ३२ लाखांची होणार आहे.

☞ सन २०२२-२३ मध्ये राज्यावरील कर्जाचा एकूण भार रु. ६ लाख ४९ हजार ६९९ कोटी इतका असून, वर्ष २०२१-२२ मध्ये तो रु.५ लाख ७२ हजार ३७९ कोटी होता. म्हणजे मागील वर्षाच्या तुलनेत एकूण कर्जात रु. ७७ हजार ३२० कोटींनी (१०.८२%) वाढ झाली आहे.

☞ सन २०२२-२३च्या रु.६ लाख ४९ हजार ६९९ कोटींच्या एकूण कर्जाच्या रकमेमध्ये वेतन, निवृत्ती वेतन व व्याज यांची एकत्रित रक्कम रु. २ लाख ३५ हजार ४९ कोटी (३६.१८%) इतकी आहे.

☞ सन २०२२-२३ मध्ये राज्याचे स्थूल राज्य उत्पन्न रु. ३५ लाख ८१ हजार ५१६ कोटी इतके असून त्या तुलनेत राज्यावरील एकूण कर्जाचे (रु. ६ लाख ४९ हजार ६९९ कोटी) प्रमाण १८.१४% आहे.

## केंद्रीय करातील राज्याचा हिस्सा व केंद्राकडून मिळणारे सहाय्य :

☞ सन २०२१-२२ मध्ये केंद्रीय करातील राज्याचा हिस्सा रु.५१ हजार ५८७ कोटी ७५ लाख इतका आहे.

☞ सन २०२१-२२ मध्ये केंद्र शासनाकडून सहाय्यक अनुदानाच्या स्वरुपात राज्याला रु.१० हजार ९८९ कोटी येणे असून त्यापैकी दि. १० मार्च, २०२१ पर्यंत रु.५ हजार ९७० कोटी ११ लाख प्राप्त झाले आहेत.

☞ राज्य शासनाने विविध विभागांना दिलेल्या हमी पैकी वर्ष २०२०-२१च्या अखेरी पर्यंत येणारी रक्कम रु.४१ हजार ५७९ कोटी ९४ लाख इतकी आहे. त्यावरील शुल्क म्हणून राज्याला रु.३ हजार ५०२ कोटी ५० लाख येणे होते त्यापैकी केवळ रु.२ कोटी ६६ लाखांची (०.०८%) रक्कम प्राप्त झाली आहे.


## राज्यातील शासकीय व निमशासकीय कर्मचारी :

☞ सन २०२०-२१ नुसार राज्यात शासन, शासकीय अनुदान प्राप्त संस्था, सार्वजनिक क्षेत्रातील युनिट यामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची एकूण संख्या १४ लाख ९५ हजार ४९४ इतकी असून त्यांच्यावरील वेतनाचा खर्च रु.१ लाख ६ हजार २८१ कोटी ५७ लाख इतका झाला आहे.

*(स्त्रोत: वित्त विषयक विवरण पत्र, संक्षिप्त अर्थसंकल्प, महाराष्ट्र राज्याचे मध्यम मुदतीचे राजकोषीय धोरण, राजकोषीय धोरणाच्या व्युहरचनेचे विवरणपत्र आणि प्रकटीकरण, वर्ष २०२१-२२ व २०२२-२३)*

# राज्य अर्थसंकल्पाचे आकारमान वाढते मात्र प्रत्यक्षात खर्चात घट

आलेख क्र: १ **राज्य अर्थसंकल्पाचे वाढते आकारमान :**




| | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अर्थसंकल्पीय अंदाज | २२४०५६ | २४३०२६ | २७०७६३ | ३००३९७ | ३६७२८० | ४०३२०७ | ४३४०८४ | ४८४०९० | ५४८४०७ |
| सुधारित अंदाज | २३०९३२ | २४७३२४ | २८२४५४ | ३२३६५२ | ३७३२३४ | ४१६९२१ | ४३७३९० | ४९६६३७ | |
| प्रत्यक्ष खर्च | २१७७४७ | २२५२८६ | २५६९४२ | २८६७६८ | ३२८७३२ | ३७८६६६ | ४०१७२४ | | |

*( स्रोत : वित्तविषयक विवरणपत्र, टीप : अर्थसंकल्प २०२२-२३, सुधारित अंदाज २०२१-२२, अर्थसंकल्पीय अंदाज २०२२-२३)*

- **वर्ष २०२२-२३ चा अर्थसंकल्प रु. ५ लाख ४८ हजार ४०७ कोटींचा आहे. आधीच्या वर्षाच्या अर्थसंकल्पाशी म्हणजेच वर्ष २०२१-२२च्या सुधारित अंदाजाशी तुलना करता रु. ५१ हजार ७७० कोटींनी अधिक आहे.**
- **वर्ष २०१४-१५ ते २०२०-२१ या कालखंडाचा विचार करता वर्ष २०१४-१५, २०१५-१६, २०१६-१७, २०१७-१८, २०१८-१९, २०१९-२० व वर्ष २०२०-२१ मधील प्रत्यक्ष खर्च हा अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा अनुक्रमे रु. ६ हजार ३९० कोटी, रु. १७ हजार ७४० कोटी, रु. १३ हजार ८२१ कोटी, रु. १३ हजार ६२९ कोटी, रु. ३८ हजार ५४८, २४, ५४१ कोटी व वर्ष २०२०-२१ मध्ये रु. ३२ हजार ३६० कोटी इतका कमी झाला.**
- **वर्ष २०१४-१५ ते २०२०-२१ मधील प्रत्यक्ष खर्च सुद्धा नेहमीच सुधारित अंदाजापेक्षा कमी झालेला आढळतो. वर्ष २०२१-२२ मध्येही तोच कल कायम राहणार आहे.**
- **वर्ष २०२०-२१ मध्ये प्रत्यक्ष खर्च सुधारित अंदाजापेक्षा रु.३५ हजार ६६६ कोटीने कमी झाला आहे. तेवढ्या रकमेने खर्चात कपात झाली.**
- **सुधारित अंदाजांपेक्षा प्रत्यक्ष खर्च कमी याचाच अर्थ निधीची उपलब्धता न झाल्याने खर्चाला लावलेली कात्री म्हणावी लागेल.**

# क्षेत्रनिहाय खर्चात रु. ३९ हजार ४३४ कोटींची कपात

## ग्रामीण विकासाला खीळ

**(क्षेत्रनिहाय खर्च-वार्षिक कार्यक्रम-२०२०-२१)**

तक्ता क्र.१ *(रु. कोटीत)*

| वर्ष २०२०-२१ | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **अक्र.** | **क्षेत्र** | **अपेक्षित खर्च** | **प्रत्यक्ष खर्च** | **वाढ/घट (+/-)** | **प्रमाण (%)** |
| १. | कृषि व संलग्न सेवा | १६,३३३.९४ | १३,४८१.०५ | -२,८५२.८९ | -१७.४७ |
| २. | ग्रामीण विकास | ५,१२४.८६ | ३,२९४.३६ | -१,८३०.५० | -३५.७२ |
| ३. | विशेष क्षेत्र विकास | १६०.०० | ११४.९५ | -४५.०५ | -२८.१२ |
| ४. | पाटबंधारे व पूरनियंत्रण | ११,८९७.८६ | ५,५५१.७० | -६,३४६.१६ | -५३.३४ |
| ५. | ऊर्जा | ९,१११.३५ | ९४३०.१८ | ३१८.८३ | ३.५० |
| ६. | उद्योग व खाण | ८४२.८५ | ३१२.२८ | -५३०.५७ | -६२.९५ |
| ७. | परिवहन | १६,८४६.२३ | १२,३८६.२३ | -४,४६०.०० | -२६.४७ |
| ८. | विज्ञान, तंत्रज्ञान व पर्यावरण | ३८०.८९ | ४६.२६ | -३३४.६३ | -८७.८५ |
| ९. | सामान्य आर्थिक सेवा | १,९७१.८५ | ५६०.३६ | -१,४११.४९ | -७१.५८ |
| १०. | सामाजिक व सामूहिक सेवा | ४२,५८८.३४ | २४,९६१.५९ | -१७,६२६.७५ | -४१.३९ |
| ११. | सामान्य सेवा | ७,५६४.५१ | २,७४१.१२ | -४,८२३.३९ | -६३.७६ |
| १२. | इतर कार्यक्रम | २,१७७.३२ | २,६८५.६३ | ५०८.३१ | २३.३५ |
| | **एकूण** | ११५,०००.०० | ७५,५६५.७१ | -३९,४३४.२९ | -३४.२९ |

*(स्त्रोत :वार्षिक कार्यक्रम, संक्षिप्त विवरण व वित्त विषयक विवरण पत्र-२०२०-२१ व २०२२-२३, वित्त विभाग)*

- **क्षेत्रनिहाय खर्चाचा आढावा घेता असे दिसून येते की, वर्ष २०२०-२१ मध्ये १२ क्षेत्रावरील कार्यक्रमांसाठी रु. १ लाख १५ हजार कोटींचा अपेक्षित खर्च होता त्यापैकी, प्रत्यक्ष खर्च केवळ रु. ७५ हजार ५६५ कोटी ७१ लाख करण्यात आला आहे. याचाच अर्थ रु. ३९ हजार ४३४ कोटी २९ लाख (३४.२९%) इतका कमी निधी या क्षेत्रांच्या कार्यक्रमांवर खर्च झाला.**

- **सामाजिक व सामुहिक सेवा खर्च हे दुर्बलांना न्याय देण्यासाठी निधी दिला जातो. या क्षेत्राचा अपेक्षित खर्च रु. ४२ हजार ५८८ कोटी ३४ लाख इतका होता, त्यापैकी रु. २४ हजार ९६१ कोटी ५९ लाख खर्च करण्यत आले. त्यामुळे खर्चात रु. १७ हजार ६२६ कोटी ७५ लाखांची (४१.३९%) घट झाली आहे.**

- पाटबंधारे व पूरनियंत्रण क्षेत्रासाठी अपेक्षित खर्च रु. ११ हजार ८९७ कोटी ८६ लाख होता मात्र प्रत्यक्षात रु. ५ हजार ५५१ कोटी ७० लाख खर्च करण्यात आले. म्हणजेच अपेक्षित खर्चापेक्षा रु. ६,३४६ कोटी १६ लाखांचा (५३.३४%) कमी निधी दिला गेला.

- सामान्य सेवा या क्षेत्रासाठी रु. ७ हजार ५६४ कोटी ५१ लाख इतका निधी खर्च होणे अपेक्षित होते, त्यापैकी रु. २ हजार ७४१ कोटी १२ लाखांचा निधी खर्च झाला. रु. ४ हजार ८२३ कोटी ३९ लाखांचा (६३.७६%) निधी कमी खर्च झाला आहे.

- परिवहन सेवा क्षेत्रासाठी रु. १६ हजार ८४६ कोटी २३ लाखांचा निधी खर्च होणे अपेक्षित होते, मात्र प्रत्यक्षात रु. १२ हजार ३८६ कोटी २३ लाख खर्च करण्यात आले. याचाच अर्थ रु. ४ हजार ४६० कोटी (२६.४७%) कमी खर्च झाला.

- कृषि व संलग्न सेवांसाठी रु. १६ हजार ३३३ कोटी ९४ लाखांचा खर्च करणे अपेक्षित होते परंतु प्रत्यक्ष खर्च रु. १३ हजार ४८१ कोटी ५ लाख झाला आहे. म्हणजेच रु. २ हजार ८५२ कोटी ८९ लाख इतका कमी निधी खर्च झाला आहे. त्यामुळे या क्षेत्रावरील खर्चात (१७.४७%) ची घट झाली आहे.

- ग्रामीण विकास हा राज्याच्या विकासाचा पाया आहे. या क्षेत्रासाठी रु. ५ हजार १२४ कोटी ८६ लाखांची तरतूद करण्यात आली होती, परंतु प्रत्यक्ष खर्च रु. ३ हजार २९४ कोटी ३६ लाखांचा झाला. खर्चात रु. १ हजार ८३० कोटी ५० लाखांची (३५.७२%) घट झाली आहे.

**वित्तमंत्र्यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पात वर्ष २०२०-२१ मध्ये रु. ४१ हजार १४१ कोटी ८४ लाखांचे महसुली तूट दाखविले आहे. मात्र जर वरील क्षेत्रांवर रु. ३९ हजार ४३४ कोटी ३९ हजार कोटी खर्च होणे अपेक्षित होते, हा खर्च झाला असता तर ही तूट वाढून रु. ८० हजार ५७६ कोटी १३ लाखांवर गेली असती, हे निश्चित.**

# सामाजिक विभागांच्या खर्चात १५ हजार १५२ कोटींची कपात

## सामाजिक विभागांचा विकास रोखला

तक्ता क्र.२ (रु. कोटीत)

| वर्ष २०२०-२१ | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अक्र. | विभाग | अपेक्षित खर्च | प्रत्यक्ष खर्च | घट/वाढ (-/+) | % |
| १. | शालेय शिक्षण | ६३,३१६.२७ | ५३,७८५.९० | -९,५३०.३७ | -१५.०५ |
| २. | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य | १६,०७०.२९ | १२,०९९.११ | -३,९७१.१८ | -२४.७१ |
| ३. | सार्वजनिक आरोग्य | १०,३२२.७१ | १०,८३२.२९ | ५०९.५८ | ४.९४ |
| ४. | आदिवासी विकास | ११,५५७.८८ | ८,७१८.३३ | -२,८३९.५५ | -२४.९३ |
| ५. | अन्न व नागरी पुरवठा | ११,३९१.५० | ११,२८२.९० | -१०८.६० | -०.९५ |
| ६. | महिला व बाल विकास | ३,५३२.२० | ४,३१९.६७ | ७८७.४७ | २२.२९ |
| | एकूण | १,१६,१९०.८५ | १,०१,०३८.२० | १५,१५२.६५ | -१३.०४ |


*(स्रोत : अर्थसंकल्पीय अंदाज , भाग -२ खर्चाचे विभागवार अर्थसंकल्पीय अंदाज वर्ष २०२०-२१ व २०२२-२३)*

- वर्ष २०२०-२१ मध्ये शालेय शिक्षण, सामाजिक न्याय, सार्वजनिक आरोग्य, आदिवासी विकास, अन्न व नागरी पुरवठा तसेच महिला व बाल विकास या ६ विभागांच्या खर्चात रु. १५ हजार १५२ कोटी ६५ लाखांची घट झाली आहे. घटीचे हे प्रमाण १३.०४% इतके मोठे आहे.
- शालेय शिक्षण विभागाच्या खर्चात सर्वात मोठी घट झाली असून ती रु. ९ हजार ५३० कोटी ३७ लाखांची आहे. खर्चातील घट १५.०५% झाली आहे.
- सामाजिक न्याय विभाग रु. ३ हजार ९७१ कोटी १८ लाख. घटीचे प्रमाण २४.७१% आहे.
- आदिवासी विकास विभाग रु. २ हजार ८३९ कोटी ५५ लाख (२४.९३%) घट झाली आहे.
- अन्न व नागरी पुरवठा रु. १०८ कोटी ६० लाख (०.९५%) घट झाली आहे.

# सामाजिक सेवांवरील खर्चाला कात्री लावून
## शासन आणू पाहतेय राजकोषीय स्थैर्य

**महसुली व राजकोषीय तुटीचे राज्य स्थूल उत्पन्नाशी असलेले प्रमाण हे शासनाच्या आर्थिक स्थितीचे निदर्शक मानले जाते. राजकोषीय उत्तरदायित्त्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन कायद्यानुसार शासनास महसुली तूट २००८-०९ पर्यंत शून्यावर व राजकोषीय तूट राज्य स्थूल उत्पन्नाच्या प्रमाणात ३%वर आणावयाची होती. वर्ष २००६-०७ पासून अनेक खटपटी करून शासनाने हे उद्दिष्ट साध्य केले होते. परंतु आता दरवर्षी सामाजिक क्षेत्रातील योजनांच्या खर्चाला कात्री लावून सदर उद्दिष्ट साध्य केले जात आहे. त्यातून राज्याच्या विकास हा मूळ हेतू साध्य होताना दिसत नाही. अनेक प्रकल्प वर्षानुवर्षे प्रलंबित असल्याचे चित्र दिसत आहे. ही स्थिती कायम राहिली तर भविष्यात राज्याच्या विकासावर प्रतिकूल परिणाम होईल.**

आलेख क्र: २ **तुटीचे स्थूल राज्य उत्पन्नाशी प्रमाण:**




| | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| राजकोषीय तूट | १.७९ | १.४४ | १.७६ | १.०२ | ०.९० | १.९७ | २.६४ | २.७९ | २.५ |
| महसुली तूट | ०.७० | ०.३० | ०.४० | -०.०९ | -०.४७ | ०.६३ | १.५२ | ०.९६ | ०.६८ |

*(स्त्रोत: वित्तविषयक विवरण पत्र, टीप : अर्थसंकल्प २०२२-२३)*


- **वर्ष २०१४-१५ मध्ये राजकोषीय तूट १.७९% होती, तर महसुली तूट ०.३०% होती त्यामध्ये वाढ होत वर्ष २०२०-२१ मध्ये ही तूट अनुक्रमे २.५०% व ०.६८% वर पोहोचली आहे.**

**वेतन, निवृत्ती वेतन, व्याज यासारख्या बांधिल खर्चामध्ये सातत्याने वाढ होत असून त्यामुळे महसुली तूट वाढत आहे. याचाच परिणाम होऊन भांडवली खर्चात आवश्यक त्या प्रमाणात वाढ करता येत नाही, ही चिंतेची बाब झाली आहे. करामध्ये अथवा करेतर महसुलामध्ये वाढ करण्यास असलेल्या मर्यादा विचारात घेता राज्यामुळे गुंतवणुकीस सुयोग्य वातावरण निर्माण करणे, अनुत्पादक खर्चास आळा घालणे, हाती घेतलेले प्रकल्प वेळेत पूर्ण करणे गरजेचे आहे. जेणे करून राज्याच्या आर्थिक वाढीस हातभार लागेल.**

# राज्यावरील कर्ज रु. ६ लाख ५० हजार कोटी

## राज्यावरील व्याजासह एकूण कर्ज रु. ६ लाख ९६ हजार ४६२ कोटी !

**आलेख क्र. ३**




| | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| राज्यावरील एकूण कर्ज | २९४२६१ | ३२४२०२ | ३६४८१९ | ४०२४२१ | ४०७१५२ | ४५१११७ | ५१९०८६ | ५७२३७९ | ६४९६९९ |

*(स्रोत : संक्षिप्त अर्थसंकल्प - २०२२-२३ )*

- **वर्ष २०२२-२३ मध्ये राज्याचे एकूण कर्ज रु. ६ लाख ४९ हजार ६९९ कोटी इतके अंदाजित करण्यात आले आहे. या दायित्वामध्ये शासनाने विकासासाठी केलेले अन्य करार अंतर्भूत नाहीत. मान. मुख्यमंत्र्यांनी जाहीर केलेले अंदाज लक्षात घेता हा निधी राज्याच्या तिजोरीतून गेला नाही तरी ते दायित्व राज्याच्या जनतेवर अप्रत्यक्ष येणारच आहे.**

- **सामाजिक क्षेत्रावरील खर्च कमी झाल्याने अनेक सामाजिक योजनांच्या खर्चात रु. ३९ हजार ४३४ कोटी २९ लाखांची (३४.२९%) कपात झाली आहे. त्यामुळे राज्याच्या विकासाची गती मंदावली आहे.**

*(स्रोत :वार्षिक कार्यक्रम, संक्षिप्त विवरण पत्र - २०२०-२१ व २०२२-२३, वित्त विभाग)*

# राज्यातील प्रत्येक नागरिकावर
# ५५ हजार ७६२रुपयांचे व्याजासह कर्ज !

**राज्याचे एकूण कर्ज, व्याज तसेच स्थूल राज्य उत्पन्न व दरडोई कर्ज**

तक्ता क्र.३ *(रु. कोटीत)*

| वर्ष | राज्यावरील कर्ज व स्थूल राज्य उत्पन्न | | | | दरडोई कर्ज (रुपयात) |
|---|---|---|---|---|---|
| | कर्ज | व्याज | एकूण कर्ज | स्थूल राज्य उत्पन्न | |
| २०१४-१५ | २,९४,२६१ | २३,९६५ | ३,१८,२२६ | १७,९२,१२२ | २८,३११ |
| २०१५-१६ | ३,२४,२०२ | २५,७७१ | ३,४९,९७३ | २०,०१,२२३ | ३१,१३६ |
| २०१६-१७ | ३,६४,८१९ | २८,५३२ | ३,९३,३५१ | २२,५७,०३२ | ३४,९९५ |
| २०१७-१८ | ४,०२,४२१ | ३३,५१८ | ४,४०,३२९ | २४,९६,५०५ | ३९,१७५ |
| २०१८-१९ | ४,०७,१५२ | ३४,०२१ | ४,४१,१७३ | २६,३२,७९२ | ३९,२५० |
| २०१९-२० | ४,५१,११७ | ३३,५६१ | ४,८४,६७८ | २७,३४,५५२ | ३८,८०५ |
| २०२०-२१ | ५,१९,०८६ | ३६,९७० | ५,५६,०५६ | २७,११,६८५ | ४४,५२० |
| २०२१-२२ | ५,७२,३७९ | ४१,२८७ | ६,१३,६६६ | ३१,९७,७८२ | ४९,१३२ |
| २०२२-२३ | ६,४९,६९९ | ४६,७६३ | ६,९६,४६२ | ३५,८१,५१६ | ५५,७६२ |

*स्रोत: संक्षिप्त अर्थसंकल्प २०२२-२३ टीप : अर्थसंकल्पीय अंदाज २०२२-२३, सुधारित अंदाज २०२१-२२)*

*(टीप : राज्याची लोकसंख्या वर्ष २०२१-२२ अंदाजित, १२.४९ कोटी.)*

- राज्य स्थूल उत्पन्नाशी कर्जाचे असलेले प्रमाण हे राज्याच्या आर्थिक स्थितीचे निदर्शक मानले जाते. वर्ष २०१४-१५ मध्ये जेव्हा युतीचे शासन आले त्यावेळी राज्यावरील एकूण कर्ज रु. ३ लाख १८ हजार २२६ कोटी इतके होते. त्यावेळी राज्याचे स्थूल राज्य उत्पन्न रु. १७ लाख ९२ हजार १२२ कोटींचे होते. स्थूल राज्य उत्पन्नाशी राज्याच्या एकूण कर्जाचे प्रमाण (१७.७६%).
- वर्ष २०१९-२० मध्ये महाविकास आघाडीचे शासन आले. वर्ष २०२२-२३ मध्ये राज्याचा व्याजासहीत कर्जाचा एकूण भार रु. ६ लाख ९६ हजार ४६२ कोटींवर गेला असून, राज्य स्थूल उत्पन्न रु. ३५ लाख ८१ हजार ५१६ कोटी आहे. स्थूल राज्य उत्पन्नाशी राज्यावरील एकूण कर्जाचे प्रमाण (१९.४५%) एवढे झाले आहे.
- स्थूल राज्य उत्पन्न त्या तुलनेत राज्यावरील एकूण प्रमाण याचा विचार केला तर मागील ७ वर्षात कर्जाचे प्रमाण सरासरी १.६९% वाढले आहे.
- राज्यातील प्रत्येक व्यक्तीवर व्याजासहित असलेला कर्जाचा भार हा ५५ हजार ७६२ रुपये इतका आहे.

# महाराष्ट्र राज्याची ठळक वैशिष्ट्ये

## लोकसंख्या :

- राज्यातील स्त्री- पुरुष प्रमाण ९२९, मुंबईतील स्त्री-पुरुष प्रमाण ८३२ इतके कमी तर रत्नागिरी जिल्ह्यातील प्रमाण १ हजार १२२ इतके जास्त आहे.
- ० ते ६ वर्षांमधील बालकांमधील मुलींचे प्रमाण घटले १९९१ मध्ये ते ९४६ होते तर २०११च्या जनगणनेनुसार त्यात ५२ने घट होत ८९४ झाले आहे.
- महाराष्ट्रातील नागरी लोकसंख्येचे प्रमाण ४२.२ टक्के.

## १५व्या वित्त आयोगानुसार राज्याला केंद्राकडून मिळणारी वित्तीय मदतीची सद्यस्थिती :

- १५व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार एकूण रु. ३ लाख ३७ हजार २५२ कोटी रक्कमेचा वित्तीय संसाधने येणे बाकी आहे. त्यापैकी रु. ७० हजार ३७५ कोटी सहाय्यक अनुदाने आहेत. तर स्थानिक स्वराज्य संस्थांना रु. ४१ हजार ३९१ कोटी तसेच शहरी व ग्रामीण आरोग्य संस्थांच्या बळकटीकरणाकरिता रु. ७ हजार ६७ कोटी येणे बाकी.
- १५व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार वर्ष २०२१-२२ ते २०२५-१६ या कालावधीसाठी राज्य आपत्ती जोखीम व्यवस्थापन निधीअंतर्गत केंद्र शासनाकडून राज्याला रु. १७ हजार ८०३ कोटी रुपये येणे बाकी आहे.

## साक्षरता :

- महाराष्ट्रातील साक्षरता दर ८२.३ टक्के असून अनुसूचित जातीमध्ये तो ७९.७ टक्के तर अनुसूचित जमातीमध्ये ६५.७ टक्के आहे.

## आरोग्य सेवा :

- राज्यात ३६ जिल्हे असून त्यापैकी २३ जिल्ह्यात जिल्हा रुग्णालये कार्यरत आहेत मात्र त्यापैकी १३ जिल्ह्यात आजही जिल्हा रुग्णालये नाहीत.

- राज्यात १७ स्त्री रुग्णालये असून आजही १९ जिल्ह्यात जिल्हा रुग्णालयांची आवश्यकता आहे.
- एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत ० ते ५ वयोगटातील वर्ष २०२१-२२ मध्ये ६१ लाख १० हजार ६२९ बालकांचे वजन केले असता त्यापैकी ४ लाख ९४ हजार ९६१ बालके ही मध्यम कमी वजनाची आढळली तर ८५ हजार ५४९ बालके ही तीव्र कमी वजनाची होती.

## स्त्रियांवरील अत्याचार:

- वर्ष २०१९ मध्ये महिलांवरील अत्याचाराचे ३७ हजार ११२ गुन्हे घडले असून ५ हजार ४१६ बलात्काराचे गुन्हे दाखल झाले आहेत. तर विनयभंगाच्या सर्वात जास्त म्हणेज १३ हजार ६३२ गुन्हे नोंदविले गेले आहेत. तसेच अपहरण व पळवून नेण्याच्या ६ हजार ९०६ गुन्हे घडले आहेत. वर्ष २०२० मध्ये महिलांवरील अत्याचाराचे ३१ हजार ९५४ गुन्ह्यांची नोंद झाली असून, वर्ष २०२१ मध्ये १० महिन्यात ३० हजार १२५ गुन्ह्यांची नोंद झाली आहे.
- टाळेबंदी काळात महिलांवरिल कौटुंबिक छळ तसेच पती व नातेवाईकांकडून झालेल्या अत्याचाराच्या प्रमाणात वाढ झाली असून, वर्ष २०२० मध्ये महिलांवरील अत्याचाराची ६ हजार ७२९ प्रकरणे घडली होती तर वर्ष २०२१ ऑक्टोबर पर्यंत दहा महिन्याच्या कालावधीत ८ हजार २४ प्रकरणांची नोंद झाली.

## बालकांवरील अत्याचार:

- वर्ष २०१९ मध्ये १७ हजार ५१७ बालकांवर अत्याचार झाले असून ३ हजार २५४ बालकांवर बलात्कार झाले आहेत. तर ४१ बालकांचा खून करण्यात आला. तर वर्ष २०२० मध्ये १४ हजार ३७१ गुन्हे घडले असून वर्ष २०२१ मध्ये ९ महिन्यात १० हजार ८५२ बालकांवरील अत्याचाराच्या गुन्ह्यांची नोंद झाली आहे.

## कामगार:

- वर्ष १९६१ मध्ये एकूण लोकसंख्येत कामगारांचे प्रमाण ४७.९ टक्के होते त्यात २०११ मध्ये घट होऊन हे प्रमाण ४४ टक्क्यांवर आले आहे. याचा अर्थ महाराष्ट्रातील कामगारांची संख्या ३.९ टक्क्याने घटली आहे.

- शेती व संलग्न कार्य, वास्तु निर्माण प्रक्रिया, सेवा व दुरुस्ती या उद्योगात वर्ष १९७१ पासून सातत्याने घट झाली असून बांधकाम, व्यापार आणि वाणिज्य, वाहतूक साठवण दळणवळण, वीज, गॅस व पाणी पुरवठा या उद्योगामध्ये सातत्याने वाढ होत आहे.

## रोजगार:

- फेब्रुवारी, २०२२च्या आकडेवारीनुसार महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या १२ कोटी ४९ लाख इतकी अंदाजित असून ४ कोटी ४७ लाख ६७ हजार ८०३ (३५%) व्यक्तींना रोजगार प्राप्त झाला होता. सध्याचा राज्याचा बेरोजगारीचा दर १५.५% इतका मोठा असून कोविड-१९ महामारी काळात तो २१% पोहोचला होता.

## शासकीय विभाग व जिल्हा परिषदांमधील रिक्त पदे:

- दि. ५ मार्च, २०२१ रोजी सामान्य प्रशासन विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार राज्यातील सर्व शासकीय विभाग व जिल्हा परिषदांमधून १० लाख ९९ हजार १०४ पदे मंजूर असून त्यापैकी ८ लाख ९८ हजार ९११ पदे भरली गेली आहेत, तर २ लाख १९३ पदे रिक्त आहेत.

## महाराष्ट्र राज्य माहिती आयोग:

- डिसेंबर, २०२० पर्यंत महाराष्ट्र राज्य माहिती आयोगातील विविध कार्यालयात माहिती अधिकाराखाली ९ हजार ७४५ तक्रारी प्रलंबित असून त्यापैकी सर्वात जास्त ३ हजार ८६ तक्रारी औरंगाबाद कार्यालयात प्रलंबित असून त्यानंतर मुंबई मुख्यालयात १ हजार ६८४ तक्रारी प्रलंबित आहेत तर नाशिक मध्ये १ हजार १३२ तक्रारी प्रलंबित आहेत.

## राज्यातील झोपडपट्टीतील राहणाऱ्या नागरिकांची स्थिती:

- राज्यातील झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या लोकांची संख्या २००१ मध्ये रु.१ कोटी १२ लाख होती त्यामध्ये वाढ होऊन ती १ कोटी १८ लाख झाली आहे. म्हणजे ती ६ लाखाने वाढली आहे. त्यात २०२२ पर्यंत आणखी वाढ होईल.
- १ कोटी १८ लाख लोकसंख्ये पैकी २३ टक्के लोकसंख्या ही नागरी भागात राहत होती.
- झोपडपट्टीत राहणाऱ्या एकूण लोकसंख्येपैकी १५.७ टक्के लोकसंख्या ही अनुसूचित जातीची आहे.
- झोपडपट्टीत राहणाऱ्या एकूण लोकसंख्येतील स्त्री-पुरुष प्रमाण ८७ इतके कमी आहे.
- राज्यातील कुटुंब संख्या २.३८ लाख इतकी असून त्यापैकी ९७ लाख कुटुंबांना पिण्याच्या पाण्याची उपलब्धता परिसरात नाही.
- ३८ लाख कुटुंबापर्यंत वीज पोहोचलेली नाही.
- १ कोटी ३४ लाख कुटुंबांना एलपीजी गॅस उपलब्ध झालेला नाही. ही कुटुंब जळाऊ लाकूड, केरोसीन याचा वापर करतात.
- १ कोटी ११ लाख कुटुंबांच्या परिसरात शौचालये उपलब्ध नाहीत.

## जल जीवन अभियानाची राज्यातील अंमलबजावणी :

- राज्यातील १ कोटी ४६ लाख ८ हजार ५३२ कुटुंबांना जल जीवन मिशननुसार नळजोडणी केली जाणार होती त्यापैकी १ कोटी २ हजार १६३ कुटुंबांना या कार्यक्रमांतर्गत नळ जोडणी मिळाली तर अद्यापपर्यंत ४६ लाख ६ हजार ३६९ कुटुंबांना नळ जोडणी झालेली नाही.
- राज्यातील शाळा ८५ हजार ३१७ व नळ जोडणी करायची होती त्यापैकी ७७ हजार ६०७ शाळांमधून नळ जोडणी झाली असून, अद्यापपर्यंत ७ हजार ७१० शाळांची नळ जोडणी झालेली नाही.

- राज्यातील ९१ हजार २६७ अंगणवाडीपैंकी ८१ हजार ९७८ अंगणवाड्या नळाद्वारे जोडण्यात आल्या असून अद्यापपर्यंत ९ हजार २८९ अंगणवाड्यांची नळ जोडणी प्रलंबित आहे.

## कृषी व संलग्न, सेवा तसेच उद्योग क्षेत्राची स्थिती:

- सन २०२०-२१ मध्ये कृषी व संलग्न कार्य क्षेत्रात १७.९ टक्के वाढ परंतु मत्स्य व्यवसाय व मत्स्य शेती क्षेत्रात वास्तविक स्थूल राज्य मूल्यवृद्धी दर ६.४ टक्के घट.
- उद्योग क्षेत्रात वास्तविक स्थूल राज्य मूल्यवृद्धी दरात १० टक्के घट, वास्तु निर्माण क्षेत्र १३.३ टक्के घट, तर बांधकाम क्षेत्रात ११ टक्के घट.
- सेवा क्षेत्रात ९ टक्के घट, व्यापार दुरुस्ती, हॉटेल्स व उपाहारगृहे या क्षेत्रात १३.५ टक्के घट, वाहतूक, साठवण व दळणवळण व प्रसारण संबंधी सेवा यामध्ये २१.६ टक्के घट, व्यावसायिक सेवा ६.७ टक्के घट.
- वर्ष २०१९-२०च्या तुलनेत वर्ष २०२०-२१ मध्ये मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, कोल्हापूर, नागपूर या प्रगतीपथावर असलेल्या सर्व जिल्ह्यांचे दरडोई जिल्हा उत्पन्न घटले.
- राज्यात ५२ हजार ५५७ रास्त भाव दुकाने असून त्यापैकी अन्नधान्य प्रकारचे गैरव्यवहार करणाऱ्या १८६ रास्तभाव दुकानांचे परवाने रद्द करण्यात आले असून २०९ दुकानांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत.

## राज्यातील शिधापत्रिका बायोमॅट्रीक धोरणाची व्याप्ती व सद्यस्थिती:

- राज्यात एकूण शिधापत्रिका धारकांची संख्या २ कोटी ५६ लाख इतकी असून त्यापैकी बायोमेट्रिक पद्धतीने धान्य घेणाऱ्या कुटुंबांची संख्या १ कोटी ४३ लाख

इतकी आहे. याचा अर्थ आजही १ कोटी १३ लाख शिधापत्रिका धारकांची रेशन कार्ड बायोमॅट्रिक झालेली नाहीत.

## सिंचन व बिगर सिंचन पाणी पट्टी थकबाकी:

- सिंचन बिगर सिंचन पाणी पट्टी आकारणी, वसुली व थकबाकी सन २०२०-२१ पर्यंत रु. २ हजार ५४४ कोटी ५१ लाखांपर्यंत पोहोचली आहे.

## औद्योगिक गुंतवणूक:

- अखिल भारतात ओद्योगिक गुंतवणूक रु. १ कोटी ३८ लाख ४० हजार कोटी असून त्यापैकी महाराष्ट्रात रु. १५ लाख ९ हजार ८११ कोटी झाली आहे. महाराष्ट्रातील गुंतवणुकीचे प्रमाण १०.९% आहे.
- एप्रिल २००० ते सप्टेंबर २०२१ पर्यंत संपूर्ण भारतात रु. ३४ लाख ४ हजार ९४४ कोटींची गुंतवणूक झाली असून त्यापैकी महाराष्ट्रात रु. ९ लाख ५९ हजार ७४६ कोटींची विदेशी गुंतवणूक झाली आहे. गुंतवणुकीचे महाराष्ट्रातील प्रमाण २८.२%आहे.

*(स्त्रोत:आर्थिक पाहणी, २०२१-२२ व संक्षिप्त अर्थसंकल्प २०२२-२३)*